क्रमांकः-आस्था/2607/२०१८
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
८३, डॉ. ॲनी बेझंन्ट रोड,
३ रा मजला, धर्मादाय आयुक्त भवन,
वरळी, मुंबई-४०० ०१८
दि.:- 03 MAY 2018

पहाः- या कार्यालयाचे पत्र ज्ञापन दि.३०/०१/२०१८

**परिपत्रक क्रमांक ५३८ दिनांक ०३/०५/२०१८**

या कार्यालयाचे असे निदर्शनास आले आहे की, धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालय(मुख्यालय), मुंबई तसेच धर्मादाय सह आयुक्त, बृहन्मुंबई विभाग, मुंबई या कार्यालयातील काही कर्मचारी हे धर्मादाय आयुक्तालयाच्या इमारतीत विनापरवानगी वास्तव्य करत असल्याचे त्याचप्रमाणे सदरहु कर्मचारी इमारतीमध्ये बेशिस्त वर्तणुक करत असल्याचे आढळून आले आहे.

त्याकरीता सदरहु परिपत्रकाद्वारे निर्देशित करण्यात येते की, यापुढे धर्मादाय आयुक्तालयाच्या इमारतीमध्ये कोणत्याही कर्मचा-याने वास्तव्य करु नये. इमारतीमध्ये राहत असलेल्या कर्मचा-यांनी आपली राहण्याची व्यवस्था स्वतः करावी. यापुढे धर्मादाय आयुक्तालयाच्या इमारतीमध्ये कोणी कर्मचारी वास्तव्यास राहत असल्याचे आढळून आल्यास त्यांचेविरुध्द आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, याबाबत नोंद घ्यावी.

धर्मादाय आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

O/C

प्रतः-
१) सूचना फलक
२) धर्मादाय सह आयुक्त, बृहन्मुंबई
३) सर्व अधिकारी/कर्मचारी
४) सर्व पहारेकरी

धर्मादाय सह आयुक्त, बृहन्मुंबई/धर्मादाय उप आयुक्त, मुख्यालय यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देण्यात यावे व सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे सूचित करण्यात यावे.